

वयोवृद्धः मनोयुवा


# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.


वर्ष-३२ अंक-६ किंमत : रु. ३०/- जून २०२४




## हार्दिक शुभेच्छा




राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे वतीने **डॉ. यशस्विनी जनवाडकर** आणि **डॉ. प्रा. मानसिंग जगताप** यांना **जीवन गौरव पुरस्कार** प्रदान करताना फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे. सोबत दै. पुढारीचे उपसंपादक पछिंद्र साहेब, के. बी. गुरव व के. डी. कदम



# जिल्हा सनियंत्रण समन्वय समिती व ज्येष्ठ नागरिक धोरण......

फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल

ज्येष्ठ नागरिकांसाठी अतिशय महत्त्वाची असणाऱ्या सनियंत्रण समन्वय समिती आणि ज्येष्ठ नागरिक धोरणाबाबत आणि समितीच्या उपयुक्ततेबाबत माहितीचा उहापोह या अंकाबरोबरच पुढील काही अंकाद्वारा ज्येष्ठ नागरिक संघासमोर व वाचकासमोर ठेवणेचा मानस कौन्सिलने केला आहे. या अंकात शासनाच्या दि. १८/०७/२०१८ व दि. ३१/१०/२०१९ रोजीचे शासन निर्णय सर्वांचे माहितीसाठी देत आहोत.

दि.३१/१०/२०१९ रोजीचा शासन निर्णय ज्येष्ठांबाबत अतिशय महत्त्वाचा आहे. या निर्णयानुसार जिल्हास्तरावर सनियंत्रण समितीचे मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठण करणेचे आणि समाज-कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त हे सचिव म्हणून असलेचे आदेशित केले आहे. या समितीत ज्येष्ठ नागरिकांचे दोन सदस्यांचा अंतर्भाव आहे. ज्येष्ठ नागरिक सदस्य जेवढे अभ्यासू आणि योग्य मुद्देसुद विचार मांडणारे असतील, तेवढे ज्येष्ठ नागरिकांबाबतचे धोरण, आईवडील व ज्येष्ठ नागरिक पालनपोषण कायदा यशस्वी करणेसाठी फायदेमंद ठरणार आहे. प्रत्येक प्रादेशिक विभागांच्या अध्यक्षांची याबाबत भुमिका व कार्यक्षमता महत्त्वाची ठरणार आहे. जिल्हास्तरावरील शासन यंत्रणेशी/विभाग प्रमुखांशी जेवढे नाते घट्ट व अभ्यासपूर्वक, तेवढी प्रत्येक विषयाची मांडणी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

काही कारणमिमांसेचा विचार न करता बऱ्याच जिल्हास्तरावर सनियंत्रण समन्वय समित्यांच्या तिमाही सभा होत नसलेच्या दिसतात. काही जिल्ह्यात या समितीवर दोन ज्येष्ठ नागरिक सदस्यांच्या नियुक्त्या केलेल्या देखील दिसत नाहीत. शासन निर्णय दि.३१/१०/२०१९ रोजीचा असून जवळजवळ ४ वर्षानंतरची ही परिस्थिती चिंताजनक वाटते. काही जिल्ह्यात सनियंत्रण समितीचे सचिव हे अकार्यक्षम वाटतात. सदरच्या सभा आयोजित करणेत त्यांनाच स्वारस्य वाटत नाही. एका जिल्ह्यात समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी सभा नियमित ठेवणेबाबतच्या सूचना देवून देखील टाळाटाळ केली जात आहे ही वस्तुस्थिती आहे. समितीच्या सभेस शासनाने सुचित केलेनुसार विविध विभाग प्रमुख अगर निर्णयक्षमता असणारे प्रतिनिधी उपस्थित नसतात हे देखील निदर्शनास येते. ज्येष्ठ नागरिक प्रतिनिधी यांनी वस्तुस्थिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणणे आवश्यक वाटते.

जिल्ह्यातील सर्वच ज्येष्ठ नागरिकांच्या व्यथांचा सदर सभेत उहापोह होणे आवश्यक आहे. प्रामुख्याने आईवडील व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ कायद्याचा आढावा होणे व त्यापूर्वी प्रत्येक महसुल न्यायालयाकडील प्रलंबित प्रकरणांची- कालावधीसह माहिती प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांचे जवळ असणे अत्यावश्यक आहे. सदरच्या माहितीखेरीज प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष आपली मते मांडू शकणार नाहीत. प्रकरणांची वस्तुस्थिती सभेचे वेळी अध्यक्षांचे समोर येऊ शकणार नाही. याचबरोबर जिल्ह्यातील विविध ज्येष्ठ नागरिकांच्या अगर इतर ज्येष्ठ नागरिकांच्या व्यथांवर (न्यायालयीन प्रकरणाखेरीज) मार्ग निघू शकणार नाहीत. या प्रसंगी ज्येष्ठ नागरिक हा ज्येष्ठ नागरिक संघाचा सभासद आहे कां नाही? हा विचार आवश्यक नाही. प्रादेशिक विभागाचे वतीने ज्येष्ठ नागरिक संघाचा सदस्य नसलेल्या ज्येष्ठांच्या व्यथा देखील सदर सभेत मांडून त्यांची सोडवणूक केली तर ज्येष्ठ नागरिक चळवळीला अधिक चालना मिळेल. यासाठी प्रत्येक प्रादेशिक विभागाच्या अध्यक्ष यांनी ज्येष्ठ नागरिक संघाद्वारा- वृत्तपत्राद्वारा ज्येष्ठ

नागरिकांच्या व्यथा/अडचणी, कोणत्याही शासकीय विभागातील प्रलंबित प्रकरणांची (न्यायालयीन प्रकरणाखेरीज) माहिती संकलित करुन त्याचा अभ्यास करुन त्याची सदर सभेद्वारा कशाप्रकारे सोडवणूक करता येईल याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. फेस्कॉमचे 'अंगीकृत' उद्दीष्ट साध्य करावयाचे असेल तर प्रादेशिक विभागाच्या अध्यक्षांनी सतत कृतिशील राहणे आवश्यक आहे.

ज्येष्ठ नागरिक संघाच्या/ ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणांची विविध खात्यानिहाय माहिती सनियंत्रण समितीचे सचिव तथा सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचेकडे नियोजित सभेचे किमान १५ दिवस आधी प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांनी पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर सभेत चर्चा होवून प्रलंबित प्रश्नांना मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांचेकडून न्याय मिळू शकेल. ज्येष्ठ नागरिक संघ अगर ज्येष्ठ नागरिकांना न्याय मिळणेचे दृष्टीने मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा ज्येष्ठ नागरिक सनियंत्रण समन्वय समितीचे सभेस अनन्यसाधारण महत्त्व आहे.

या अंकापासून ज्येष्ठ नागरिक सनियंत्रण समन्वय समितीच्या वतीने वास्तव न्यायाच्या दृष्टीने आणि शासनमान्य ज्येष्ठ नागरिक धोरणाबाबत उहापोह केला जाणार आहे. या दृष्टीने वाचकांनी देखील ज्येष्ठांचे प्रश्न कोणते व कसे सोडविता येतील याबाबतची माहिती आपल्या प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांचेकडे पाठवून त्याची एक प्रत मनोयुवा कौन्सिलला पाठवावी असे आवाहन करणेत येत आहे. याचबरोबर ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत आणि यशस्वीतेबाबत आपले विचार मनोयुवा कौन्सिलला कळवावेत, ही खास विनंती.

***

## बळीराजाची प्रभात फेरी



सोंगढोंग ते ना मॉर्निंग वॉकचे
विळा कोयता बांधून कमरेला
सहज घेऊन नांगर खांद्यावर
चालू लागतो भास्कर भेटीला

पाहून घड्याळ मनगटीचे
दिनकर होतो तेव्हा चकित
कोंबडा सुध्दा कबूल करतो
फारच चढली काल रात्रीत

तंत्र बिघडले आज कालचे
आळशी झाले सारे जण
सूर्य कोंबडा अपवाद नाहीत
रोजच नसतो तरी सण

पोटासाठी नसते तडजोड
उठावे लागते बळीराजाला
पाढा वाचून नाही चालत
सबबी ऐकवून कर्तव्याला

पाऊस कधी कां कुठे पडतो
पाहून राबाचा धूर आकाशी
पकडून मुहूर्त मृग नक्षत्राचा
लगट कराया येतो धरणीशी

बळीराजाची प्रभात फेरी
म्हणून चर्चेचा झाला विषय
परीक्षा घेतोय निसर्ग सर्वांची
करत नाही नुसता अभिनय

– विनायक जोशी, ठाणे
मीलनध्वनी/९३२४३२४१५७

**"जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती" गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्र. डीडीपी -२०१९/प्र.क्र.३११/सामासु**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. ३१ ऑक्टोबर, २०१९

**प्रस्तावना-**

भारतीय संविधानातील राज्य धोरणाची निर्देशक तत्वातील अनुच्छेद ३९ क व ४१ मधील तरतूदीनुसार ज्येष्ठ नागरिकांना वृध्दापकाळ चांगल्या त-हेने घालविता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसहय व्हावे, शारिरीक व मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे यासाठी राज्याचे सर्वसमावेशक धोरण दि. ९ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम २०१०, दि. २३ जून, २०१० च्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर नियम २०१० मधील नियम २२ नुसार जिल्हास्तरावर अधिनियमाच्या प्रभावी तथा समन्वित अंमलबजावणीसाठी आणि सल्ला देण्यासाठी प्रत्येक जिल्हयाकरिता ज्येष्ठ नागरिकांसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती" स्थापन करण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्हयाकरिता मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती" स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम २०१९, दि. २३ जून, २०१० च्या अधिसूचनेमधील नियम २२ नुसार, प्रत्येक जिल्हयाकरिता मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे **जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती** गठीत करण्यात येत आहे.

सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | सह अध्यक्ष |
| ३ | सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य सचिव |
| ४ | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ५ | मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत | सदस्य |
| ६ | महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघ यांचे २ प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | जिल्हा पोलीस अधिक्षक | सदस्य |
| ८ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ९ | जिल्हा महिला बालविकास अधिकारी | सदस्य |

शासन निर्णय क्रमांकः डीडीपी -२०१९/प्र.क्र.३११/सामासु

२. **कार्ये-** १) जिल्हास्तरावर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि समस्या निवारणाच्या अनुषंगाने सल्ला देणे.

२) तसेच ही समिती जिल्हा स्तरावर राज्य शासन विनिर्दिष्ट करेल अशी व ज्येष्ठ नागरिकांच्या संबंधात अन्य कर्तव्ये पार पाडील.

३. उपरोक्त जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समितीचा कार्यकाल किमान १ वर्षाचा किंवा जोपर्यंत जिल्हाधिकारी सदरची जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती बरखास्त करीत नाही तोपर्यंत राहील.

४. सदर समितीची आवश्यकतेनुसार ३ महिन्यातून किमान एकदा बैठक घेण्यात यावी. सदर बैठकीकरिता ज्येष्ठ नागरिक सदस्यांना आवश्यक तो बैठक भत्ता अदा करण्यात यावा .

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९१०३११५५३३६०५२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

# फेस्कॉम घटना दुरुस्ती चा चेंज रिपोर्ट मंजूर

**फेस्कॉम ने घटना दुरूस्तीचा चेंज रिपोर्ट मा.धर्मादाय आयुक्त, वरळी (मुंबई) यांचेकडे दिनांक २१/१२/२०२३ रोजी सादर केला. या घटना दुरूस्तीच्या अर्जास मा.धर्मादाय आयुक्त साहेब यांनी दिनांक १०/०४/२०२४ रोजी मंजूरी देवून परिपूर्ण आदेश नुकताच पारित केला आहे. या आदेशामुळे फेस्कॉम च्या कार्यपद्धतीला मोठे यश प्राप्त झाले. या यशाचे मानकरी अध्यक्ष अरूण रोडे, उपाध्यक्ष आण्णासाहेब टेकाळे, मुख्य सचिव विवेक देशपांडे,प्रादेशिक विभागांचे अध्यक्ष चंद्रकांत महामुनी व शरद डिचोलकर तसेच ॲड. बी. टी. निसळ व ॲड. राजन दीक्षित असून या सर्व कार्यकर्त्यांचे मनोयुवा कौन्सिल चे वतीने खास अभिनंदन.**

**(आदेशाच्या प्रतीसाठी मलपृष्ठ पहा.)**

**ज्येष्ठ नागरिक धोरण-२०१३ ची महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती क्षेत्रात अंमलबजावणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:- ज्येनाधो-२०१८/प्र.क्र.९६/नवि-२८**
मुख्य इमारत (४ था मजला), मंत्रालय,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०१ नोव्हेंबर, २०१८

संदर्भ:- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.ज्येष्ठना-२०१६/प्र.क्र.७१/ सामासू, दि.०९.०७.२०१८.

**शासन परिपत्रक:-**

भारताच्या संविधानातील राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम-३९ (क) व ४१ मध्ये ज्येष्ठ नागरिक सुस्थितीत असावा अशी तरतूद आहे. ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता, त्यांना वृद्धापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारीरिक/ मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे, वृद्धापकाळामध्ये त्यांची आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळविण्यासाठी राज्य शासनाने संदर्भाधीन दि.०९.०७.२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण-२०१३ ची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केलेले आहे. सदर शासन निर्णयामध्ये शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांना या धोरणातील निर्णयासंबंधी कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. सदर धोरणाच्या अंमलबजावणीचे अनुषंगाने नगर विकास विभागाअंतर्गत सर्व महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायतींना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या उपरोक्त संदर्भाधीन दि.०९.०७.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या ज्येष्ठ नागरिक धोरणामधील या विभागाशी संबंधीत सर्व बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

२) ज्येष्ठ नागरिक धोरण सक्षमपणे राबविण्यासाठी **प्रत्येक महानगरपालिकेने** त्यांचे आस्थापनेवरील **एका उप आयुक्त/सहायक आयुक्त** यांचेवर जबाबदारी सोपवावी व त्यांचे नाव/पदनाम/ कार्यालयीन दूरध्वनी/मोबाईल क्रमांक/ई-मेल शासनास तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना सादर करावेत. **नगरपालिका/**

**नगरपरिषदा/नगरपंचायती**मध्ये सदर धोरण राबविण्याची जबाबदारी **मुख्याधिकारी** यांची राहील.

३) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी **नगरपालिका/ नगरपरिषदा/नगरपंचायती** यांचेसह **सर्व महानगरपालिकांचा** ज्येष्ठ नागरिक धोरण राबविण्याबाबत **दर दोन महिन्यांनी** आढावा घ्यावा व त्याचा सर्वसमावेशक अहवाल शासनास सादर करावा.

**३.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८११०११५५५१२३१२५ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(नवनाथ रा. वाठ)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

पृष्ठ २ पैकी २

## पुस्तक परिक्षण 'तरंग' बाबत दिलगिरी

'तरंग' या पुस्तकाच्या लेखिका प्रा. डॉ. सुशिला ओडेयार असून परिक्षण फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल कोल्हापूरचे माजी अध्यक्ष मा. प्राचार्य एस. डी. साळुंखे सर यांनी केले आहे. 'तरंग' पुस्तकाचे परिक्षणाचे पान माहे मे २०२४ च्या अंकातील पान क्र. २४ वर प्रसिध्द झाले असून अनावधानाने लेखिकेचा आणि परिक्षकांचा उल्लेख राहून गेला असून याबद्दल दिलगिरी व्यक्त करीत आहोत.

– संपादक

**BEFORE THE ASSISTANT CHARITY COMMISSIONER-I,**
**GREATER MUMBAI REGION MUMBAI**

**CHANGE REPORT No.ACC-I/7639/2023**
**(Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950)**

In the matter of Public Trust:- **"Federation of Senior Citizen Organization of Maharashtra"**
**P.T.R. No. F-7528 (Mumbai)**

Arun Madhav Rode : **Reporting Trustee**

-: **V E R S U S** :-

Nil. : **Objector**

**ORDER BELOW EXH.No.01.**

**(Delivered on this 10th day of April, 2024)**

1) This change report is filed by a reporting trustee of the above named trust in respect of the Change occurred due to amendment made in Memorandum of Association and Rules and Regulation of the Society.

2) Perused the record. Heard. It appears that Memorandum of Association of the trust are proposed to be amended as mentioned in Schedule-III. Application for amendment is also filed under Society Registration Act 1860. It appears from documents on record that due procedure has been followed. The above mentioned change is in accordance with the Memorandum of Association and Rules and Regulation of the society. None has taken objection to it. Therefore, prima facie the change is legal and valid. Hence, following order.

-: **O R D E R** :-

1. Change report is hereby accepted.
2. Schedule-I be amended accordingly.
3. No order as to cost.

**(K.K.Ghule)**
**Assistant Charity Commissioner-I**
**Greater Mumbai Region Mumbai.**

**Place :- Mumbai.**
**Date :- 10.04.2024.**

Certified to be a True copy

Superintendent (Certified Copy)
Public Trust Registration Office
Greater Mumbai Region Mumbai

04/06/24

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2024-2026

## दि. १ एप्रिल २०२४ पासूनचे सुधारित दर

### वर्गणीचे दर

| | | |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | - | ३५०/- |
| द्विवार्षिक वर्गणी | - | ६००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | - | ९००/- |
| पंचवार्षिक वर्गणी | - | १,३५०/- |
| आधारस्तंभ | - | २,५००/- |

(फोटोसाठी रु. ५००/- जादा, परिचय नाही)

### जाहिरातीचे दर

| | रंगीत | कृष्णधवल |
|---|---|---|
| कव्हर पेज ४ | - ८,०००/- | --- |
| कव्हर पेज २/३ | - ७,०००/- | --- |
| आतील पूर्ण पान | - ६,०००/- | ४,०००/- |
| आतील अर्धे पान | - ३,०००/- | २,०००/- |
| आतील पाव पान | - २,०००/- | १,५००/- |
| ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यक्रमाचे व शुभेच्छा फोटो (आकार ३'' x २'') | - १०००/- | ७५०/- |

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

PRINTED MATTER

प्रति,

________________

________________

________________